सर्व शिक्षा अभियान

# रायगड जिल्हा परिषद

## प्राथमिक शाळा - पेणधर, ता. पनवेल

● स्थापना दि. १०/०६/१९६३ ●

जा. नं. 23 / 58 10/96

दिनांक : 96/01/96

प्रति,
मा. अध्यक्ष साहेब,
तळोजा इंडस्ट्रिज असोशिएशन,
तळोजा एम.आय.डी.सी.

निवेदन:- मुख्याध्यापक, रा.जि.प. शाळा पेणधर
यांजकडून सविनय सादर

महाशय,

वरील विषयान्वये विनंती अर्ज करतो की, आमच्या शाळेय इमारतीचे बांधकाम सन २००० मध्ये झालेले असून त्यानंतर या इमारतीचे दुरुस्तीचे काम कधीही झाले नाही. सदर इमारतीमध्ये आठ वर्ग खोल्या व एक मुख्याध्यापक वर्ग खोली अशा एकूण नऊ खोल्या आहेत.

१. <u>इमारत दुरुस्ती:-</u>

सदर इमारतीमध्ये दुरुस्तीची नितांत गरज आहे. सर्व वर्ग खोल्यांमध्ये पावसाचे पाणी गळत असल्यामुळे पावसामुळे मुलांची बसण्याची अत्यंत गैरसोय होत आहे. तसेच ते धोकादायक ही आहे. लाकडी खिडक्या पूर्ण मोडलेल्या असून खिडकी वरील सज्जे देखील तुटलेले आहेत. इमारतीच्या पश्चिमेकडील (मागील) पूर्ण भिंतीचे प्लॅस्टर धोकादायक झाले आहे. त्यामुळे पावसाचे पाणी सर्व वर्गात भरते. त्यामुळे मुलांना बसण्याची गैरसोय होत आहे.

२. <u>शौचालयाची गरज:-</u>

सध्या शाळेचा पट ३०० विद्यार्थी असा असून त्यांच्यासाठी असलेले शौचालय अपुरे आहे. तसेच ते नादुरुस्त मोडकळीस आलेले आहे. त्यामुळे नवीन शौचालयाची नितांत गरज आहे. सदरचे शौचालय अडगळीचे व चुकीच्या ठिकाणी बांधकाम केलेले आहे. त्यामुळे मानसिक कुचंबना होत आहे.

३. <u>भौतिक सुविधांची गरज</u>:-

शाळेला एकूण ९ वर्ग खोल्या असून १० शिक्षक कार्यरत आहेत. सर्व शिक्षकांसाठी प्रत्येकी टेबल, खुर्ची व कपाटाची गरज आहे. (१० टेबल, १० खुर्ची व १० कपाटे)

४. <u>टेरेसची दुरुस्ती</u>:-

सदर टेरेसचे काही पत्रे तुटलेले आहेत तसेच सभोवतालचे ग्रील धोकादायक झाले आहे. तरी पत्रे आणि ग्रीलचे काम करुन मिळावे.

५. <u>पिण्याच्या पाण्याची सोय</u>:-

शालेय विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत आहे. पिण्याच्या पाण्याची साठवण व शुद्धीकरणाची सोय करुन मिळावी. (फिल्टर)

तरी आमच्या अर्जाचा सहानुभुतीपूर्वक विचार करुन आणि मुलांच्या शिक्षणामधील गैरसोय लक्षात घेऊन वरील कामांसाठी आपणाकडून सहकार्य मिळावे हि नम्र विनंती.

कळावे

आपला विश्वासू

अध्यक्ष
शाळा व्यवस्थापन समिती
रा. जि. प. प्राथ. शाळा
पेणधर, ता. पनवेल

मुख्याध्यापक
रा. जि. प. प्राथ. शाळा - पेणधर
ता. पनवेल, जि. रायगड